# मुंबई प्रांतामधील स्वातंत्र्यपूर्व काळामधील स्त्रियांची पत्रकारिता

Dr Dhiraj Suresh Shinde
Head, Department of History
Smt.Akkatai Ramgonda Patil Kanya Mahavidyalaya,
Ichalkaranji, Dist Kolhapur

**गोषवारा :**

वृत्तपत्रे ही आजच्या २१ व्या शतकात लोकशाही शासनप्रणालीत "Forth Estate Of the Kingdom" म्हणून ओळखली जातात भारतातील पाश्चात्यांच्या आगमनानंतर मुद्रणकला विकसित होत जाऊन वृत्तपत्रसृष्टी बहरत गेली. भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा अधिकृतपणे जनक 'जेम्स हिकी' याने २९ जानेवारी १७८० रोजी प्रसिध्द केलेल्या ''कलकत्ता जनरल ॲडव्हाटायझर' या नावाच्या साप्ताहिकास जाते. मराठीतील सर्वप्रथम पाक्षिक वृत्तपत्र म्हणून दर्पण हे ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रकाशित केले. आरंभीच्या मराठी वृत्तपत्रकरिता विशिष्ठ वर्गापुरती सीमित होती. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी महात्मा फुलेंनी 'ब्राम्हणेत्तर वृत्तपत्र चळवळ' आरंभ केली.या जाणीवेतून १ जानेवारी १८७७ रोजी महात्मा फुले यांचे अनुयायी कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधू' वृत्तपत्र पुण्यात आरंभ केले. परंतु पुढे आर्थिक हलाखीमुळे दीनबंधू हे वृत्तपत्र १८९७ ला बंद पडले. पुढे १९०५ मध्ये वासुदेव बिर्जेनी दीनबंधू वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन केले. १९०८ ला त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी तानुबाई बिर्जे यांनी दिनबंधूची जबाबदारी यशस्वीपणे पेलली. या काळात पंडिता रमाबाई, न्या. रानडेंच्या पत्नी रमाबाई, सावित्रीबाई फुले,राधाबाई शिंदे,तानुबाई बिर्जे,सावित्रीबाई रोडे,जनाक्का शिंदे,गंगुबाई खेडकर अशा ब्राम्हणेत्तर स्त्रियांनी महिला लेखन, पत्रकारिता,अध्यापन अशा क्षेत्रामध्ये कार्यरत दिसतात. १९०१ ते १९३० पर्यंत खास स्त्रियांसाठी १५ मासिके निघाली. त्यात ८ मासिकांच्या संपादक स्त्रिया होत्या.स्त्रियांच्या हक्क,प्रश्नावर मुंबई प्रांतामधील अनेक वृतपत्रे आणि त्यांचे संपादक सातत्याने लिखाण करत असत.प्रातिनिधिक स्वरूपामध्ये दै.सत्यवादीने खास अंक निर्माण करण्यास सुरवात केली. इ.स १९३४ पासून सत्यवादीमध्ये स्त्री विभाग सुरु झाला.तत्कालीन मराठी वृत्तपत्रामध्ये स्वतंत्रपणे स्त्री विभाग १९ नोव्हेंबर १९३३ मध्ये सुरु करून त्याच्या संपादिका मनोरमा खाबडे या पदवीधर स्त्री संपादिका असलेले एकमेव दैनिक होते. मराठी वृत्तपत्राच्या उदयानंतर वेगळ्या पद्धतीने स्त्रीवादी पत्रकारिता विकसित होत गेली. परंतु दुर्देवाने भविष्यात त्यांची कर्तबगारी विस्मरणात गेली. मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात या महिला संपादकाची नोंदही घेतलेली नाही.

**प्रास्ताविक :**

वृत्तपत्रे ही आजच्या २१ व्या शतकात लोकशाही शासनप्रणालीत "Forth Estate Of the Kingdom" म्हणून ओळखली जातात.कारण वृत्तपत्रातून प्रकट होणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या प्रतिबिंबामुळे होय.आधुनिक कालखंडात वर्तमानपत्रास प्राप्त झालेले स्वरूप हे मुद्रणकलेच्या शोधामुळे प्राप्त झाल्याने 'वृत्तपत्र संस्थेची जन्मदात्री' म्हणून मुद्रणकलेचा उल्लेख करणे आवश्यक आहे.सर्वप्रथम प्राथमिक अवस्थेत चीनमध्ये छपाईच्या शोधानंतर पुढे युरोपात छापखान्याची कला ही टप्प्या-टप्प्याने विकसित होत गेल्याने ज्ञान हे विशिष्ठ वर्गापुरते न राहता त्याचा प्रसार सर्वसामान्य युरोपीय जनतेतही घडून आला.भारतातील पाश्चात्यांच्या आगमनानंतर मुद्रणकलेचा विकास झाल्याचे दिसते.स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये तत्कालीन मुंबई प्रांतामध्ये मुद्रणकला विकसित होत जाऊन वृत्तपत्रसृष्टी बहरत गेली.त्यास अनेक कांगोरे असून त्यापैकी ब्राम्ह्णेत्तर वृत्तपत्रांचे कार्य,त्यातील स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्वाचे ठरले.

**उद्दिष्ट्ये**

- ☐ वृत्तपत्राचा पूर्वइतिहास अभ्यासणे.
- ☐ वृत्तपत्राच्या विकासाच्या वाटचालीची माहिती घेणे.

- मराठी वृत्तपत्रामधील विविध प्रवाहांची माहिती प्राप्त करणे.
- ब्राह्मणेतर वृत्तपत्रे आणि त्यामधील स्त्रियांच्या वाटचालीचा आढावा घेणे.
- प्रातिनिधिक स्वरूपामध्ये स्त्री संपादिकांची माहिती घेणे.

**जागतिक मुद्रणकला व त्यातून वृत्तपत्रांचा उदय**

वृत्तपत्रासाठीच्या मुद्रणकलेचा विकास जरी युरोपात झाला असला तरी त्याचे जनकत्व चीनकडे जाते. प्राचीन चीनमधील गीर्वाण भाषेतील मुळ ग्रंथ दगडावरती कोरून लिहण्याची पद्धत होती. तरी मुद्रणकलेचा फारसा विकास चीनमध्ये झाला नाही.१पुढे युरोपात जुळवणी योग्य खिळयांचा शोध इ.स.१४४० च्या दरम्यान लागला.जर्मनीतील जुहान्स गुटेनबर्ग याने १४३६ मध्ये मुद्रणाचा शोध लावताना सर्वप्रथम चिनीमाती, लाकूड, शिसे यांचा वापर केला. त्यामुळे त्यास 'मुद्रणाचा जनक' असे म्हणतात. त्यानेच सर्वप्रथम आपल्या मुद्रणालयात बायबलची छपाई केली.२पुढे क्रमाक्रमाने युरोपात छपाईची कला विकसित होत गेली.

**भारतातील मुद्रणालय व वृत्तपत्रांचा आरंभ**

भारतात पर्यायाने पश्चात्यांच्या आगमनानंतर मुद्रणकला विकसित होत गेली. पोर्तुगीजांनी भारतात सर्वप्रथम मुद्रणयंत्र आणताना 'जुवाव-दे-वस्तुमंती' हा येथील प्रथम मुद्रक होय.पुढे भारतीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र सृष्टीचा अधिकृतपणे जनक 'जेम्स हिकी' याने २९ जानेवारी १७८० रोजी प्रसिध्द केलेल्या 'बेंगाल गॅझेट' किंवा 'कलकत्ता जनरल ॲडव्हाटायझर' या नावाच्या साप्ताहिकास जाते.'हिकीज गॅझेट' म्हणून ते प्रसिद्ध झाले.३ पुढे कालपरत्वे भारताच्या अनेक प्रांतामध्ये तेथील स्थानिक वृत्तपत्रे विविध भाषेनुसार विकसित झाली.

**मराठी वृत्तपत्रसृष्टीचा उदय व विकास**

मराठीतील सर्वप्रथम पाक्षिक वृत्तपत्र म्हणून दर्पणला ओळखतात. हे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रकाशित केले. दर्पणाच्या प्रथम अंकावर'दर १५ दिवसांनी छापावयाचे पुस्तक, कागद किंमत ½ महिन्यास 6' असा उल्लेख आहे.दर्पणनंतर मराठी वृत्तपत्रसृष्टीची वाटचाल बदलून गेली.इ.स.१८५० च्या अगोदर ज्ञानसिंधु,ज्ञानोदय,ज्ञानप्रकाश अशी पत्रे मराठीत निघाली.मुंबई प्रांतपरत्वे मराठी वृत्तपत्रसृष्टी भिन्न स्वरुपात भिन्न विचारसरणीतून बहरत गेली.४तरीही ही आरंभीची समाजातील उच्च, पांढरपेशा वर्गापुरती निगडीत व त्यांचेच हितसंबंध जोपासणारे होते.साहजिकच अशा वृत्तपत्रातून समाजातील बहुजन वंचित वर्गाचे प्रश्न, गाऱ्हाणी आणि ब्राम्हण्य प्रवृत्तीवर टीका टिप्पणी कारणे शक्य नव्हते. त्यातून आरंभीच्या मराठी वृत्तपत्रकरिता विशिष्ठ वर्गापुरती सीमित होती. त्यामुळे ब्राम्हणेत्तर वर्गाच्या समस्या, आशा-आकांक्षासाठी महात्मा फुलेंनी 'ब्राम्हणेत्तर वृत्तपत्र चळवळ' आरंभ केली.

**महात्मा फुलेंकडून ब्राम्हणेत्तर पत्रकारितेचा उगम**

भारतीय बहुजन समाजात सामाजिक समतेचे अग्रदूत म्हणून महात्मा जोतीराव फुले यांच्याकडे पहिले जाते. त्यांचा २४ सप्टेंबर १८७३ रोजी प्रस्थापित धर्म, धर्ममार्तंडविरोधी बंडाचा झेंडा फडकावून 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. "सर्वसाक्ष जगत्पती त्यास नको कोणाची मध्यस्थी" हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. परंतु सनातन्यांनी सत्यशोधक समाज व महात्मा फुले यांच्या कार्याची उपेक्षा केली.चिपळूणकरांनी सत्यशोधक समाजाविषयी लिहिले. 'कागदावरची शाई वाळावयास जितका अवधी लागेल तितकाही वेळ सत्यशोधक समाज जगात टिकणार नाही' अशा प्रचंड टीकाटिप्पणी होऊ लागल्या. त्यातून अशा टिकांना प्रतिउत्तर देण्यास सत्यशोधक समाजाची विचारधारा बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्यास सत्यशोधक समाजाची गरज होती.५ या काळातील वृत्तपत्रांचे वास्तव फुल्यांनी आपल्या शब्दात व्यक्त करताना म्हटले आहे. 'एकंदर सर्व भट वर्तमानकर्त्यांची आणि शुद्र व अतिशुद्रास तर वर्तमानपत्र म्हणजे काय कोल्हा का कुत्रा का माकड हे काहीच समजत नाही. तर मग अशा अनोळखी अतिशुद्रांची मते या सर्व सोवळ्या वर्तमानपत्रास कोठून व कशी कळणार'.६ असे केले आहे.

**ब्राम्हणेत्तर पत्रकारितेस आरंभ व विकास**

सत्यशोधक चळवळीचे ध्येय, दिशा, स्वरूप, धोरण, कार्यक्रम समाजापर्यंत नेण्यासाठी व सनातनी वृत्तपत्रातून महात्मा फुले यांच्यावरती होणाऱ्या अविचारी, असभ्य टीकांना प्रत्युत्तर देण्यासाठी चळवळीस वृत्तपत्रासारखे साधन आवश्यक आहे.या जाणीवेतून १ जानेवारी १८७७ रोजी कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधू' वृत्तपत्र पुण्यात आरंभ केले.या वृत्तपत्राचे ते पहिले संपादक होते.पहिल्या वर्षी पुण्याचे ८ व मुंबईचे ५ असे फक्त १३ सभासद होते.हे वृत्तपत्र चालवण्यास भालेकरांनी आपले घर, दागिने, जमीनही विकली. पुढे दुसरे संपादक नारायण मेघाजी लोखंडे मुंबईतील कामगार संघटनांचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी दीनबंधू पुण्याहून मुंबईस हलवले. परंतु आर्थिक हलाखीमुळे दीनबंधू हे वृत्तपत्र १८९७ ला बंद पडले. पुढे १९०५ मध्ये वासुदेव बिर्जेनी दीनबंधू वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन केले. १९०८ ला त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी तानुबाई बिर्जे यांनी दिनबंधूची जबाबदारी यशस्वीपणे पेललीे७.

पुढे ब्राम्हणेत्तर पत्रकारितेत सावळाराम यंदे, गणपतराव पाटील, भास्कर जाधव, वा.रा.कोठारी राजर्षी शाहूंच्या प्रेरणेने बळवंत पिसाळ, सखाराम सावंत, दिनकरराव जवळकर, भुजंग गायकवाड, श्रीपतराव शिंदे, हरिभाऊ चव्हाण, राजाभाऊ जाधव, माधवराव बागल असे ब्राह्मणेत्तर पत्रकार बहुजन समाजातून पुढे आले.

**ब्राम्हणेत्तर पत्रकारितेत स्त्रियांचा सहभाग**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात नियतकालीकांमधून स्त्रियांच्या स्थितीवर लेखन महाराष्ट्रात प्रारंभ झाले. १८४८ ला लोकहितवादींनी 'शतपत्रे' मधून तत्कालीन स्त्रियांच्या स्थितीची माहिती दिली.१८१८ ला आगरकरांनी सुधारक मधून केशवपन, बालविवाह पद्धतीवर हल्ला केला. आणि स्त्रीशिक्षण, विधवा विवाह या कल्पनांचा पुरस्कार केला. या काळात पंडिता रमाबाई, न्या. रानडेंच्या पत्नी रमाबाई, सावित्रीबाई फुले,राधाबाई शिंदे,तानुबाई बिर्जे,सावित्रीबाई रोडे,जनाक्का शिंदे,गंगुबाई खेडकर अशा ब्राम्हणेत्तर स्त्रियांनी महिला लेखन, पत्रकारिता,अध्यापन अशा क्षेत्रामध्ये कार्यरत दिसतात.८

सावित्रीबाई फुले या भारतातील आद्यशिक्षिका महात्मा फुलेंच्या सोबत कार्यरत होत्या. जोतीबा फुलेच्या निधनानंतर त्यांनी सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व केले. त्यासोबत काव्यफूले हा कवितासंग्रह,जोतीबांची भाषणे त्यांनी लिहिली. सावित्रीबाईंच्या प्रेरणेतून तानुबाई बिर्जे याही सत्यशोधक चळवळीत सक्रीय होत्या. पुढे त्या दिनबंधुच्या पहिल्या संपादिका झाल्या. तसेच रामोशी समाजाच्या सावित्रीबाई रोडे यांनी 'रामोशी समाचार' हे वृत्तपत्र चालवले. त्यातून पाण्याचा प्रश्न,अन्याय,भटक्या विमुक्तांचे प्रश्न मांडण्यात आले. मात्र सावित्रीबाई रोडे यांच्या बाबत फारसे तपशील मिळत नाहीत.या दरम्यान १९०१ ते १९३० पर्यंत खास स्त्रियांसाठी १५ मासिके निघाली. त्यात ८ मासिकांच्या संपादक स्त्रिया होत्या. यात बहुतांश स्त्रिया ब्राम्हणेत्तर समाजातील असून त्यांनी स्वतंत्र विचारसरणीचे लेखन केले त्यामध्ये

| **अ.क्र** | **संपादक** | **नियतकालिकाचे नाव** | **वर्षे** |
|---|---|---|---|
| १ | आनंदीबाई लाड | आर्यभगिनी | १८८६ |
| २ | कृष्णाबाई | कामिनी प्रकाश | १८९३ |
| ३ | मनोरमा मित्र | महाराष्ट्र महिला | १८९७ |
| ४ | तारा नवलकर | स्वदेश भगिनी | १९०२ |
| ५ | इजबेल रोज | प्रेमदर्शिका | १९१२ |
| ६ | सीताबाई सावंत | गृहिणी रत्नमाला | १९१६ |
| ७ | मिसेस हिटन | मातृसंघ | १९१२ |
| ८ | माई वारेकर | महिला | १९३३ |
| ९ | रुक्मिणी कदम | भगिनी | १९३५ |
| १० | विलासिनी रेळे | वनिता विश्व | १९४८ |
| ११ | प्रतिमा पटवर्धन | श्रमिक महिला | १९४९ |
| १२ | सरस्वती वैद्य | प्राची सभा | १९०८ |

१३ आनंदीबाई गाडगीळस्त्री रत्नमाला १९२६

वरील तक्त्यानुसार मासिके, त्रैमासिके यांच्या महिला संपादक दिसतात.यापैकी काही ब्राम्हणेत्तर विचारांच्या पुरस्कर्त्या होत्या.९

स्त्रियांच्या हक्क,प्रश्नावर मुंबई प्रांतामधील अनेक वृतपत्रे आणि त्यांचे संपादक सातत्याने लिखाण करत असत.प्रातिनिधिक स्वरूपामध्ये दै.सत्यवादीने खास अंक निर्माण करण्यास सुरवात केली.खास अंक म्हणजे एकाच विषयास अनुसुरून सर्व प्रकारचे लेखन करणे होय.पाक्षिक सत्यवादीने महिला खास अंक,विधवा विवाह पुरस्कार खास अंक,महाराणी ताराराणी खास अंक असे महिलाविषयक अंक काढले. हे सामाजिक विषयावरचे अंक क्रांतिकारी स्वरूपाचे असत.इ.स १९३४ पासून सत्यवादीमध्ये स्त्री विभाग सुरु झाला.तत्कालीन मराठी वृत्तपत्रामध्ये स्वतंत्र्यपणे स्त्री विभाग १९ नोव्हेंबर १९३३ मध्ये सुरु करून त्याच्या संपादिका मनोरमा खाबडे या पदवीधर स्त्री संपादिका असलेले एकमेव दैनिक होते.त्यांनी संपादिका म्हणून या विभागाचा उद्देश स्पष्ट केला आहे.त्यांनी आक्रमकपणे मांडणी करताना स्पष्ट केले कि,''स्त्री शिक्षण का द्यावे?ते कसे असावे? विधवांनी कुंकू लावावे का? त्या सकेशा असाव्यात कि विकेशा? तसेच घटस्फोट,बालविवाह,मिश्र विवाह,विधवा विवाह या स्त्रियांच्या प्रश्नावर सोयीप्रमाणे बंधने घातली आहेत.असे परखड मत मांडले आहे.याशिवाय स्त्रीशिक्षण,सक्तीची हुंडाविरोधी चळवळ,स्त्रीयांनीही नोकरी करावी,त्यांना वारसा हक्क,प्रतिनिधीत्वाचा हक्क अशा अनेक प्रश्नावर लिखाण सत्यवादीमधील स्त्री विभागामध्ये केले गेले.१०त्यामुळे सत्यावादीची ख्याती संपूर्ण मुंबई प्रांतामध्ये झाली.

**दिनबंधुच्या पहिला संपादिका : तानुबाई बिर्जे**

१९०७ मध्ये दिनबंधुचे संपादक वासुदेवराय बिर्जे यांचे निधन झाल्यानंतर दीनबंधूचे संपादकपद १९०८ साली तानुबाई बिर्जे यांनी सांभाळले. तानुबाईंना महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंचा सहवास लाभला होता. वडील देवराय ठोसर हे साधन, प्रगल्भ विचारसरणीचे गंगापूरचे खानदानी मराठा होते. त्यांचे शिक्षण मराठी व इंग्रजी माध्यमातून पुण्यात झाले. शिक्षणानंतर त्यांनी पोलीस खात्यात नोकरी केली. ते ज्योतीराव फुल्यांचे महत्वाचे सहकारी होते. त्यांनी आपल्या मुलांची लग्ने सत्यशोधक पद्धतीने केली. तुकाराम पिंजण, वासुदेव बिर्जे, बापूराव आपटे हे त्यांचे जावई सत्यशोधक चळवळीतील असून सक्रीय कार्यकर्ते होते११. तानुबाई बिर्जे यांना पार्श्वभूमी व वातावरण हे पुरोगामी चळवळीचे लाभल्याने त्यांची विचारसरणीही प्रगल्भ बनत गेली.सावित्रीबाई फुलेंच्या शाळेमधील त्या विद्यार्थिनी होत्या.पुढे पती निधनानंतर १९०८ ते १९१२ या काळात तानुबाई संपादक म्हणून त्यांनी दीनबंधूच्या लौकिकात भर घातली. त्यांनी विविध विषयानुसार लेख मांडताना आपले स्वातंत्र्य अस्तित्व दाखवून दिले.त्या केवळ संपादिका नव्हत्या तर सक्रीय सत्यशोधक कार्यकर्त्याही होत्या.सावित्रीबाई फुलेंच्यानंतर त्यांनी प्रचलित प्रवाहाविरोधी असणाऱ्या ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांचे संपादकत्व यशस्वीपणे सांभाळले.१२

**निष्कर्ष :**

मराठी वृत्तपत्राच्या उदयानंतर त्याचा मुंबई प्रांताच्या विविध मराठी भागामध्ये विकास आणि विस्तार झाला.त्यामधून परंपरागत पत्रकारिता,ब्रिटीशधार्जिण्य पत्रकारिता,महात्मा फुलेंच्या विचाराची सत्यशोधक पत्रकारिता,राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने ब्राम्हणेत्तर पत्रकारिता,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रोत्साहनाने दलित पत्रकारिता,महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने सर्वोदयी पत्रकारिता आणि या सर्वांच्यापेक्षा वेगळया पद्धतीने स्त्रीवादी पत्रकारिता विकसित होत गेली. परंतु दुर्देवाने भविष्यात त्यांची कर्तबगारी विस्मरणात गेली. मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात या महिला संपादकाची नोंदही घेतलेली नाही.

**संदर्भ सूची**

१.गुप्ते आर.एस.'द हिस्टरी ऑफ मॉडर्न सिव्हिलायझेशन',स्टर्लिंग प्रकाशन,दिल्ली, १९७५ पृ.११-१२

२.उपयोजित इतिहास,१२ वी (महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य मंडळ, पुणे २०१३,पृ.१३ )

३.लेले रा.के,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,२००४,पृ २३ ४.उपरोक्त पृ.क्र.४८

५.सरदेसाई बी.एन. आधुनिक भारताचा इतिहास,फडके प्रकाशन कोल्हापूर २००४ पृ.क्र.३४८

६. उपरोक्त पृ. क्र. ३४९

७.पिसाळ जयसिंगराव, बहुजन समाजाचे अस्त्र, लेखक ग.गो. जाधव गौरवग्रंथ, राजहंस प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर २००८ पृ. क्र. ३०८

८.कित्ता पृ.क्र. २३३

९.पाटोळे वर्षा, ब्राम्हणेत्तर पत्रकारिता- तानुबाई बिर्जे यांचे योगदान,एम.जे.सी लघुप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००३

१०.उपरोक्त पृ. ४८

११.दै सत्यवादी सुवर्णमहोत्सवी अंक,१९७५,दै सत्यवादी कार्यालय,दसरा चौक कोल्हापूर.पृ क्र ५७

१२.खरात संभाजी, दिनबंधुच्या संपादिका : तानुबाई बिर्जे प्रतिष्ठान मासिकातील लेख,१९९५, पृ.३५